गोवा सरकार

माहिती आणि प्रसिध्दी खाते

पणजी-गोवा

वार्तापत्र

## रस्ते खोदण्यावर बंदी

ता. 02 ऑगस्ट 2019

11 श्रावण 1941

उत्तर गोवा जिल्हान्यायदंडाधिकाऱ्यानी उत्तर गोव्यातील शहरी आणि ग्रामीण भागात जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगी शिवाय कोणतीही व्यक्ती, संस्था, संघटना, सरकारी खाते, स्थानिक संस्था किंवा यंत्रणांना रस्ता किंवा रस्त्याचा कोना खोदण्यास किंवा कापण्यास मनाई केली आहे.

ही बंदी वीज, बीएसएनएल आणि सार्वजनिक बांधकाम खात्याला वीज केबल, टेलिफोन केबल आणि जल वाहिनी घालण्याच्या कामासाठी लागू नाही. त्याचप्रमाणे रस्त्यांची दुरूस्ती आणि पाणी पूरवठ्याच्या पूरवठा कामासाठी निर्बंध लागू नाही. परंतु अशा कामासाठी खोदलेले रस्ते कमीत कमी सहा तासाच्या आत पुरविणे आणि 24 तासाच्या आत योग्य तऱ्हेने डांबर किंवा क्रॉक्रिट घालून दूरूस्त केले पाहिजे.

मा/वाप/एमएस/जॉआ/रना/प्रधु/2019/430